# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत,१० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectoremsd@gmail.com

---

क्र.: सी/कार्या-२आय/टे-८/कावि-को.स.कां.त./१८
दिनांक : २२/०२/२०१९

**प्रति,**
सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन नियत्रंण समिती
तथा उप वनसंरक्षक,कांदळवन कक्ष, मुंबई

**विषय :** Potential illegal work near mangrove within Chedda Nagar Area....

**संदर्भ :** १. आपलेकडील पत्र जा.क्र.कक्ष-1/ल.ले./ 177/ सन 2018-19
दि. 12/12/2018 ...
२. या कार्यालयाकडील समक्रमांकाचे पत्र दिनाक २८/१२/२०१८
३. उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांचेकडील अहवाल
क्र.उविअ/पू.उ./टे. १/कावि- १३७ दिनांक ०७/०२/२०१९

प्रस्तुत विषयांकित प्रकरणाबाबत संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये श्री. दिपक कामथ यांचा दि. १०/१२/२०१८ रोजीचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत चौकशी केली असून त्याबाबतचा विहीत नमुन्यातील अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. दिपक कामथ दि. १०/१२/२०१८ |
| ०२ | तक्रारीचा विषय | Potential illegal work near mangrove within Chedda Nagar Area... |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा: स.नं. , गावाचे नाव, तालुका. | मौजे. चेंबुर ता. कुर्ला येथील छेडानगर क्षेत्र |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | १. श्री. व्ही. एच. घुगरे, निवासी नायब तहसिलदार, कुर्ला<br>२. श्री. साहू, वनपाल<br>३. श्री. नागरगोजे, वनरक्षक, कुर्ला<br>४. श्री. सुधीर मोरे, मंडळ अधिकारी, चेंबुर |
| ०५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | विषयांकित प्रकरणी उक्त नमूद अधिकारी यांनी स्थळपाहणी पंचनामा केला आहे. त्यानुसार मौजे. चेंबुर ता. कुर्ला येथील Geo Cordinates १९.०६८८३२, ७२.९०७६४३ जागेवर माती, दगड डेब्रीजची ढीग अंदाजे तीन गाडया टाकल्याचे दिसून आले. सदरचा भराव हा जून्या स्वरुपाचा असून तो रस्त्यालगत असल्याचे दिसून आले. |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | सदरचे Geo Coordinates हे गुगल अर्थ ॲप्लिकेशन वर टाकून तसेच वनविभागाचे प्रतिनिधी यांचेकडे असलेल्या अधियसूचित कांदळवन नकाशा यांचे अवलोकन केले असता सदरचा भराव हा कांदळवन क्षेत्राच्या बाहेर असल्याचे दिसून आले. तसेच सदर ठिकाणी आजूबाजू कांदळवनाची झाडे दिसून आलेली नाहीत. तसेच सदर ठिकाणच्या पुढे २०० ते ३०० मी. अंतरावर रस्त्यालगत रोड नं. ३ येथे माती, दगडाचा १ गाडी ढीगदिसून आला. सदरचे भराव अधिसूचित कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असल्याचे दिसून आले. मात्र सदर ठिकाणी कोठेही कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आलेले नाही, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांनी त्यांचेकडील दिनांक ०७/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | नाही. |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस ठाण्याचे नाव | --- |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्याक्तीचीं नावे व पत्ता | --- |
| ०९ | कोणत्या कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | --- |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा, उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांचेकडील अहवाल व अनुषंगीक कागदपत्रे पृष्ठ क्र. ०१ ते ---- पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केलेली आहेत.

(वंदना मकू)
**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.

**प्रत :1.**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई, 302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई- 01 यांना माहितीस्तव.

Scanned by CamScanner

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी
# पूर्व उपनगर,मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

निळकंठ बिझनेस पार्क,ए विंग,तळ मजला,किरोळ रोड,विद्याविहार(पश्चिम),मुंबई ४०० ०८६
इ-मेल-sdoeasternsuburban@gmail.com दुरध्वनी क.२५११११२६

क्र. उविअ/पू.उ./टे.१/कावि- १३७/२०१९ - ९१
दिनांक : - ०७/०२/२०१९ जा.क्र.८४

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

8 FEB 2019

**विषय** कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत विहित नमुन्यातील अहवाल
Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area, Chembur, Mumbai

**संदर्भ** :- १. आपलेकडील पत्र क्रं.सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-को.स.कां.त./१८ दिनांक २०.१२.२०१८
२. तहसिलदार कुर्ला यांचेकडील पत्र क्र. तह/कुर्ला/जमीन-/कावि-२-२००८/२०१८ दिनांक १६.०१.२०१९

मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६.१०.२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक २७.०१.२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार कुर्ला यांनी सखोल चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल संदर्भ क्रमांक २ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवाल नमुन्यात पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री.दीपक कामथ दिनांक १०.१२.२०१८ |
| ०२ | तक्रारीचा विषय | Potential illegal work near mangroves within Chheda Nagar Area, Chembur, Mumbai |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा: स.नं., गावाचे नाव,तालुका. | मौजे चेंबूर, ता.कुर्ला येथील छेडानगर क्षेत्र |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | १. श्री.व्ही.एच.घुगरे, निवासी नायब तहसिलदार, कुर्ला (मुलुंड)<br>२. श्री.साहू, वनपाल<br>३. श्री.नागरगोजे, वनरक्षक, कुर्ला<br>४. श्री.सुधीर मोरे, मंडळ अधिकारी,चेंबूर |
| ०५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | मौजे चेंबूर, ता.कुर्ला येथील Geo Coordinates १९.०६८८३२, ७२.९०७६४३ या जागेवर प्रत्यक्ष जाऊन स्थळपाहणी केली असता जागेवर माती, दगड, डेब्रिजचा ढीग अंदाजे तीन गाड्या टाकल्याचे निदर्शनास आले. सदरचा भराव हा जुन्या स्वरुपाचा असून तो रस्त्यालगत झाला असल्याचे निदर्शनास आले. सदरचे Geo Coordinates हे गुगल अर्थ ॲप्लिकेशन वर टाकून तसेच वनविभागाचे |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | प्रतिनिधी यांचेकडे प्राप्त असलेल्या अधिसूचित कांदळवन नकाशा या दोघांचे अवलोकन केले असता सदरचा भराव हा कांदळवन क्षेत्राच्या बाहेर असल्याचे दिसून आले. तद्नंतर सदर जागेच्या आजूबाजूची स्थळपाहणी केली असता कांदळवनाची झाडे दिसून आली नाहीत. तसेच त्यापुढे २०० ते ३०० मी.अंतरावर रस्त्यालगत रोड नं.३ येथे माती, दगडाचा ढीग १ गाडी दिसून आला. सदरचे दोन्ही भराव हे अधिसूचित कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत दिसून आले. सदरचे भराव कोणी जेके याबाबत कोणीही सांगितलेले नाही. तसेच तहसिलदार कुर्ला कार्यालयाकडून केलेल्या स्थळपाहणीत कुठेही कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून आला नाही. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | नाही |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्र.दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नाव | नाही |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांचेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्या व्यक्तींची नावे व पत्ता | नाही |
| ०९ | कोणत्या कायद्याअंतर्गत / कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | नाही |

सोबत तहसिलदार कुर्ला, मुलुंड यांचा सविस्तर अहवाल जोडला आहे.

उपविभागीय अधिकारी
पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा

स्थळप्रतीवर मा.उपविभागीय अधिकारी यांची सही असे

Scanned by CamScanner

# तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचे कार्यालय

टोपीवाला कॉलेज इमारत, पहिला मजला, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई 400080
फोन. :- 25602386 email- tahsildarkurlaest@gmail.com

क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-०२२००१/२०१८ दि.१६/०१/२०१९

Cms/19/2783/कार्यांचि. 21.01.19 कार्या/2 आवक,

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

जिल्हाधिकारी, उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
21 JAN 2019
02/80

**विषय** : कांदळवन/ पाणथळ ऱ्हासाबाबत...
Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area, Chembur, Mumbai.

**संदर्भ** : आपलेकडील पत्र क्र.सी.कार्या-2आय/टे-8/कावि-को.स.कां.त./18 दि.20/12/2018

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दि.२७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढील नमुन्यामध्ये सादर करीत आहोत.

| अ.क्र | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व तक्रारीचा दिनांक | श्री.दिपक कामथ दि.१०/१२/२०१८ |
| ०२ | तक्रारीचा विषय | Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area, Chembur, Mumbai. |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा-स.नं.गावाचे नाव, तालुका | मौजे चेंबुर, ता.कुर्ला येथील छेडानगर क्षेत्र. |
| ०४ | चौकशी करण्या-या अधिका-याचे नाव व पदनाम | १) श्री.विजय ह.घुगरे, निवासी नायब तहसिलदार, कुर्ला (मुलुंड)<br>२) श्री.साहु, वनपाल.<br>3) श्री.नागरगोजे, वनरक्षक, कुर्ला<br>३) श्री.सुधीर मोरे, मंडळ अधिकारी, चेंबुर. |
| ०५ | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | मौजे चेंबुर, ता.कुर्ला येथील Geo Coordinates 19.068832, 72.907643 या जागेवर प्रत्यक्ष जाऊन स्थळपाहणी केली असता जागेवर माती, दगड, डेब्रीजचा ढिग अंदाजे तीन गाड्या टाकल्याचे निदर्शनास आले. सदरचा भराव हा जुन्या स्वरुपाचा असुन तो रस्त्यालगत झाला असल्याचे निदर्शनास आहे. सदरचे Geo Coordinates हे गुगल अर्थ ॲप्लीकेशन वर टाकुन तसेच वनविभागाचे प्रतिनिधी यांचेकडे प्राप्त असलेल्या अधिसुचित कांदळवन नकाशा या दोघांचे अवलोकन केले असता सदरचा भराव हा कांदळवन क्षेत्राच्या बाहेर असल्याचे दिसुन आले. तद्नंतर सदर जागेच्या आजूबाजुची स्थळपाहणी केली असता |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | कांदळवनाची झाडे दिसुन आली नाहीत. तसेच त्यापुढे 200 ते 300 मी. अंतरावर रस्त्यालगत रोड नं.3 येथे माती, दगडांचा ढिग 1 गाडी दिसुन आला. सदरचे दोन्ही भराव हे अधिसुचित कांदळवन क्षेत्रापासुन 50 मिटरच्या आत दिसुन आले. सदरचे भराव कोणी केले याबाबत कोणीही सांगितलेले नाही. तसेच आज रोजीच्या स्थळपाहणीत कुठेही कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसुन आला नाही. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | नाही. |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्र. दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | नाही. |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, त्या व्यक्तींची नावे व पत्ता | नाही. |
| ०९ | कोणत्या कायद्या अंतर्गत / कलमांतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | नाही. |

(संदीप थोरात)
तहसिलदार कुर्ला
(मुलुंड)

Scanned by CamScanner

आम्ही खाली सही करणारे कांदळवन संनियंत्रण समितीतील सदस्य निवासी नायब तहसिलदार कुर्ला (मुलुंड), वनपाल कुर्ला, वनरक्षक कुर्ला व मंडळ अधिकारी चेंबूर हे श्री विपुल धामय यांच्या ईमेलद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मौजे छेडानगर चेंबूर येथे उपस्थित राहिलो. सदर तक्रारी अर्जामध्ये कांदळवनांवर भराव करुन अनधिकृतपणे काम चालू असल्याचे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने आम्ही सर्व प्रतिनिधी जागेवर जाऊन सत्य परिस्थिती पाहून पंचनामा लिहून देत आहोत तो पुढीलप्रमाणे

तक्रारी अर्जात नमूद केलेल्या Geo coordinates 19.068832, 72.907643 या जागेवर प्रत्यक्ष जाऊन स्थळपाहणी केली असता जागेवर माती दगड डेब्रीजचा ~~भराव~~ डिग अंदाजे ५ ब्रास टाकल्याचे निदर्शनास आले. सदरचा भराव हा जुन्या स्वरुपाचा असून तो रस्त्यालगत आला असल्याचे निदर्शनास आले. सदरचे Geo coordinates हे गुगल अर्थ मॅपवर टाकून तसेच वनविभागाचे प्रतिनिधी यांचेकडे प्राप्त असलेला अधिसूचित कांदळवन नकाशा या दोघांचे अवलोकन केले असता सदरचा भराव हा कांदळवन क्षेत्राच्या बाहेर असल्याचे दिसून आले. तद्नंतर सदर जागेच्या आजूबाजूची स्थळपाहणी केली असता कांदळवनाची झाडे दिसून आली नाहीत. तसेच त्या पुढे २०० ते ३०० मी. अंतरावर रस्त्यालगत शेड नं. ३ येथे माती दगडाचा ~~भराव~~ डिग ७ गाडी दिसून आला. सदरचे दोन्ही भरावे हे अधिसूचित कांदळवन क्षेत्रापासून ५० मिटरच्या आत दिसून आले. तसेच आज रोजीच्या स्थळपाहणीत कुठेही कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून आला नाही. वरनमूद केलेले डेब्रिज कोणी टाकले आहे हे कोणीही सांगू शकत नाही.

सदरचा पंचनामा हा जागेवरील सत्यपरिस्थिती व वस्तुस्थिती पाहून केला आहे. सदरचा पंचनामा स. 11.45 वा सुरु करून 12.30 वा. संपविण्यात आला.

NDAMLS, वनरक्षक कुर्ला 16/1/2019.

व.प. कुर्ला
[illegible] मुंबई

स्थळ- छेडानगर चेंबूर
दिनांक- 16/1/2019

RNT.

16/1/19
मंडळ अधिकारी
चेंबूर (प्रभारी)

Scanned by CamScanner